श्री. अशोक नानासाहेब कडूस, शिक्षणाधिकारी (प्राथ)
जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना शासन सेवेतून
बडतर्फ करण्याबाबत..

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन आदेश क्रमांक: इएसटी-३८०१/प्र. क्र.०५/१४/प्रशा-२,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: ०२ ऑगस्ट, २०१७

<u>शासन आदेश:-</u>

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दिनांक २१.१०.२०१० रोजी शिक्षणाधिकारी व तत्सम पदावर सरळसेवने ७४ पदांवर नियुक्ती देण्याकरीता जाहिरात प्रसिध्द केली होती. त्यानुसार आयोगाने परीक्षा घेऊन दिनांक १६.०२.२०१३ च्या पत्राद्वारे पात्र उमेदवारांची शिफारस शासनाकडे पाठविली होती. त्यानुसार उमेदवारांची शैक्षणिक अर्हता, जात प्रमाणपत्र व सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या तपासणीच्या अधिन राहून दिनांक ०८.०८.२०१३ च्या शासन निर्णयाद्वारे एकूण ६८ उमेदवारांना शिक्षणाधिकारी व तत्सम पदावर नियुक्ती देण्यात आली आहे. दिनांक १२.०८.२०१३ च्या शासन शुध्दीपत्रकान्वये अधिकाऱ्यांचा मूळ प्रवर्ग, ज्येष्ठता क्रमांक तसेच नियुक्तीकरीता दिलेला प्रवर्ग यामध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

२. शिक्षणाधिकारी, महाराष्ट्र शिक्षण सेवा गट-अ (प्रशासन शाखा) या पदावर सरळसेवेच्या कोटयातील लोकसेवा आयोग पुरस्कृत उमेदवारांना पदस्थापना देण्यासंदर्भात निर्गमित करण्यात आलेल्या दिनांक ०८.०८.२०१३ च्या शासन निर्णयामध्ये अ.क्र.६ येथे खालील प्रमाणे नमूद करण्यात आले आहे :-

" महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने संबंधित उमेदवारांनी सादर केलेली सर्व कागदपत्रे संबंधित सक्षम यंत्रणेमार्फत तपासण्याच्या सूचना केलेल्या आहेत. त्यामुळे तपासणीअंती उमेदवारांनी सादर केलेली कागदपत्र खोटी अथवा बनावट आढळल्यास त्यांच्या सेवा कुठलीही पूर्वसूचना न देता तात्काळ संपुष्टात आणण्यात येतील"

३. दिनांक ०८.०८.२०१३ च्या शासन निर्णयान्वये श्री. अशोक नानासाहेब कडूस (अ.क्र.३२ आयोगाच्या शिफारशीमधील क्र.३४ व प्रवर्ग खुला) यांना शिक्षणाधिकारी पदावर नियुक्ती देण्यात आली आहे. श्री. अशोक कडूस यांचा परिविक्षाधीन कालावधी अद्याप पूर्ण झालेला नाही.

४. श्री. दत्तात्रय कारभारी गुंजाळ यांनी श्री. कडूस, शिक्षणाधिकारी यांना तीन अपत्य असूनही शासकीय सेवेत प्रवेश करतेवेळी दोन अपत्य असल्याचे चुकीचे प्रतिज्ञापत्र सादर केले असल्याची तक्रार शासनास केली होती. श्री. अशोक कडूस यांच्या विरूद्धच्या तक्रारीच्या संदर्भात चौकशी करण्याचे निदेश विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांना आयुक्त (शिक्षण) यांचे कार्यालयामार्फत देण्यात आले होते. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांनी श्रीमती मिनाक्षी राऊत, सहाय्यक संचालक, पुणे विभाग, पुणे व श्रीमती संध्या गायकवाड, उपशिक्षणाधिकारी

(माध्य.), जि. प. पुणे यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती केली होती. सदर चौकशी अधिकाऱ्यांनी खालीलप्रमाणे चौकशीचा अहवाल आयुक्त (शिक्षण)यांचेमार्फत शासनास सादर केला आहे:-

"श्रीमती गायकवाड व श्रीमती राऊत यांनी महानगरपालिका, अहमदनगर येथे दिनांक २८.९.२०१६ रोजी समक्ष उपस्थित राहून तेथील आरोग्य अधिकारी यांची भेट घेवून त्यांच्याशी चर्चा केली व तेथील दस्तऐवजाची पहणी केली. त्याअन्वये श्री. अशोक कडूस यांच्याविरूद्धच्या तक्रारीमध्ये तथ्य आढळून आले आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ नुसार दिनांक २८ मार्च, २००६ पूर्वी दिनांक ०५.०६.२००१ रोजी पहिले अपत्य हयात असताना, दिनांक २८.०३.२००६ नंतर श्री. कडूस यांना दिनांक ११.१२.२००७ रोजी दुसरे अपत्य व दिनांक ०७.०५.२०१० रोजी तिसरे अपत्य झाल्याचे दिसून येते. सदर तीनही अपत्यांच्या जन्मदाखल्याची सत्यता पडताळणी मूळ अभिलेखावरून आरोग्य अधिकारी, महानगरपालिका अहमदनगर यांच्या कार्यालयात समक्ष उपस्थित राहून करण्यात आलेली आहे. त्यामुळे श्री. अशोक कडूस यांना तीन हयात मुले असल्याचे दिसून येते."

५. सदर चौकशी अहवालावरून श्री. कडूस यांना दिनांक ७.५.२०१० रोजी तीन अपत्ये असल्याचे स्पष्ट होत आहे. शिक्षणाधिकारी व तत्सम पदावर सरळसेवेने निवडीकरीता लोकसेवा आयोगाकडून प्रसिध्द केलेल्या जाहिरात क्रमांक ०२/२०१० मधील उमेदवारांसाठी सर्वसाधारण सूचना मधील २.२.११ नुसार लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करण्याचे निर्देश आहेत. महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ अन्वये शासन सेवेतील गट-अ, ते गट-ड मधील सर्व पदांवर सरळसेवेने करावयाच्या नियुक्त्यांसाठी लहान कुटूंबाची अतिरीक्त अट लागू केली आहे. श्री. अशोक नानासाहेब कडूस यांनी दिनांक १७.११.२०१० रोजी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्र नमुना-अ मध्ये दोन अपत्ये असल्याबाबतचा उल्लेख केला आहे. तथापि, चौकशी समितीने सादर केलेल्या वरील अहवालानुसार श्री. कडूस यांना दिनांक ०७.०५.२०१० रोजी तीन अपत्य असल्याचे स्पष्ट झाले आहे. सदर चौकशी अहवालासोबत श्री कडूस यांनी दिनांक २८.०९.२०१६ व ०७.१०.२०१६ च्या पत्राद्वारे विभागीय शिक्षण संचालक, पुणे यांना तीन अपत्ये असल्याबाबतच्या तक्रारीचा खुलासा सादर करतेवेळी, त्यांचे म्हणणे खालील प्रमाणे नमूद केले आहे :-

१. श्री. गुंजाळ यांनी या विषयाबाबत मा. मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका क्रमांक १२४११/२०१५ दाखल केलेली आहे. सदर याचिका सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ठ आहे. त्यामुळे याविषयासंदर्भात कोणत्याही विभागात अथवा शासकीय कार्यालयात कोणतीही चौकशी करु नये किंवा कागदपत्रांची मागणी करण्यात येऊ नये. ही बाब न्यायप्रविष्ठ असल्याने, असे केल्यास न्यायालयीन प्रक्रियेत हस्तक्षेप ठरुन न्यायालयाचा अवमान ठरेल.
२. माझी तीन अपत्ये जरी असली तरी, यातील सर्वात मोठी मुलगी कु. ऋतुजा अशोक कडूस हीचे दत्तक विधान केलेले आहे व दत्तक विधानाचे नोंदणीकृत दस्तऐवज तयार केलेला आहे. सदर (दिनांक १२.०६.२०१३ रोजी नोंदणी केलेले) नोंदणीकृत दत्तक पत्र

व रेशनकार्डावरील एकूण अपत्यांचा पुरावा सोबत जोडला आहे. तसेच नमूद केले आहे की, सदर दत्तक समारंभ दिनांक ०९.०१.२०१० रोजी पार पडलेला आहे.

६. श्री. अशोक कडूस यांनी सादर केलेल्या वरील खुलाश्या संदर्भात नमूद करण्यात येते की,

१. मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ येथे श्री. दत्तात्रय कारभारी गुंजाळ यांनी दाखल केलेली रिट याचिका क्रमांक १२४११/२०१५ मध्ये दिनांक ०४.०७.२०१७ रोजी दिलेल्या निकाला नुसार याचिकाकर्ता श्री गुंजाळ यांनी सदर याचिका मागे घेतल्याने, ती निकालात काढण्यात आली आहे.

२. श्री. अशोक कडूस यांनी त्यांच्या दिनांक ०७.१०.२०१६ रोजी सादर केलेल्या अर्जामध्ये नमूद केले आहे की, मोठी मुलगी कु.ऋतुजा अशोक कडूस हिचा दत्तक समारंभ दिनांक ०९.०१.२०१० रोजी पार पडलेला आहे. तथापि त्यांनी नोंदणीकृत केलेला दस्तऐवज दिनांक १२.०६.२०१३ रोजीचा आहे. यावरुन असे लक्षात येते की, शिक्षणाधिकारी पदावर निवड झाल्यानंतर श्री. कडूस यांनी दस्तऐवज नोंदणीकृत केलेला आहे. तसेच या संदर्भात सामान्य प्रशासन विभागाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत :-

" म.ना.से (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ च्या प्रयोजनार्थ मुलांची संख्या संबंधीत अधिकारी/कर्मचारी जोडप्यास प्रसूतीद्वारे जन्मलेल्या मुलांच्या आधारे गणण्यात येते. त्यामुळे प्रसूतीनंतर जन्माला आलेले मूल दत्तक दिले तरी ते मूल या नियमाच्या प्रयोजनार्थ मुलाच्या संख्येत वाढ होण्याच्या संदर्भात विचारात घेण्यात येईल"

७. सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १२.१०.१९९३ च्या शासन निर्णयानुसार "एखादा शासकीय कर्मचारी शासन सेवेतील मूळ नेमणूकीसाठी संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमातील तरतूदीप्रमाणे पात्र नव्हता किंवा विहित अर्हताप्राप्त नव्हता, किंवा त्याने नेमणूक मिळविण्यासाठी खोटी माहिती दिली होती, किंवा खोटे प्रमाणपत्र सादर केले होते, त्या कर्मचाऱ्यांला सेवेत ठेवण्यात येवू नये. जर तो परिवीक्षाधीन किंवा अस्थायी शासकीय कर्मचारी असल्यास, त्याला सेवामुक्त करण्यात यावे अथवा त्याच्या सेवा समाप्त करण्यात याव्यात" अशी तरतूद करण्यात आली आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ नुसार दिनांक २८.३.२००६ नंतर जन्मलेल्या मुलांसह दोन पेक्षा जास्त मुले हयात असल्यास शासकीय सेवेसाठी अपात्र ठरविले आहे. श्री अशोक नानासाहेब कडूस यांनी दिनांक १७.११.२०११ रोजी सादर केलेल्या प्रतिज्ञापनाद्वारे तीन मुले हयात असताना देखील खोटे प्रतिज्ञापन सादर केले आहे. दिनांक १२.१०.१९९३ च्या शासन निर्णयानुसार श्री. कडूस हे अस्थायी शासकीय कर्मचारी असल्यामुळे खोटया प्रमाणपत्राद्वारे सेवेत दाखल झाले असल्यामुळे त्यांच्या सेवा समाप्त करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

८. सबब, या आदेशान्वये श्री. अशोक नानासाहेब कडूस, शिक्षणाधिकारी यांना शासन सेवेतून तात्काळ बडतर्फ करीत आहे.

९. सदर आदेश सामान्य प्रशासन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ५८०/२०१७/११, दिनांक १५. ०७. २०१७ रोजी दिलेल्या सहमतीस अनुसरुन व नियुक्ती प्राधिकारी यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

१०. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१७१२१३१७३१११३३२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ravindra Pralhad Ate

Digitally signed by Ravindra Pralhad Ate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sport Departrment, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fd5fc4fce5f6732e6657dca817ae6ee619a55d170d3c93eff53c3ca69d1a772d, serialNumber=eaa37af2edb5809b000f33d26328f6cdac80ee32afdac3f68b5821d14e41dffa, cn=Ravindra Pralhad Ate
Date: 2017.12.14 12:42:52 +05'30'

(र. प्र. आटे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. सर्व संचालक,
३. शिक्षण उप संचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.
४. श्री. अशोक नानासाहेब कडूस, (आयुक्त (शिक्षण) यांचे कार्यालयामार्फत)
५. निवड नस्ती प्रशा-२

प्रत माहितीसाठी,

१. मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे विशेष कार्य अधिकारी,
२. मा. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग यांचे स्वीय सहायक.
३. मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, यांचे स्वीय सहाय्यक.